# पनवेल रेल्वे स्थानक ते डोंबिवली रेल्वे स्थानक केडीएमटीची प्रवासी बस सेवा सुरू

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले शुभारंभ

पनवेल(प्रतिनिधी) प्रवासी संघ पनवेलच्या वतीने प्रवासी बांधव, तळोजा औद्योगिक कामगार व टी एम ए यांनी केलेल्या सततच्या मागणीनुसार पनवेल रेल्वे स्थानक(पश्चिम) ते डोंबिवली रेल्वे स्थानक (पश्चिम) अशी बससेवा सुरू करण्यात आली असून या सेवेचा शुभारंभ शुक्रवारी (दि.२५) आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणुन नगराध्यक्षा चारूशिला घरत, प्रवासी संघाचे अध्यक्ष डॉ.भक्तीकुमार दवे, कार्यवाह व मध्य रेल्वे उपनगरीय सल्लागार समिती सदस्य श्रीकांत बापट, यशवंत ठाकरे, कफचे मार्गदर्शक अरूण भिसे, जनसंपर्क प्रमुख के.जी.म्हात्रे, श्री बेहरे, अश्वत्थामा ज्येष्ठ नागरिक संघचो अध्यक्ष प्रकाश विचारे, सचिव डि.जी.मगरे,खजिनदार साहेबराव जाधव, केडीएमटीचे सहाय्यक वाहतूक निरिक्षक प्रमोद बागुल, तिकिट तपासणीस एम.एस.बडवे, के.जी.धारावणे, चालक मधुकर अवसरमोल, संतोष बागुल, वाहक विनोद वागमोडे, यांच्यासह प्रवासी उपस्थित होते.

## मार्ग परिक्रमा बस नं.७६

पनवेल रेल्वे स्टेशन (पश्चिम), पनवेल एसटी डेपो, खांदा कॉलनी, आसुडगांव डेपो, कळंबोली पोलिस स्टेशन, नावडा फाटा, एमआयडीसी, आयजीपीएल,उसाटणे गांव, नाऱ्हेण फाटा, चिरडपाली फाटा,उंभार्ली गाव, खोणी फाटा, हेदुटणे, कोळेगांव, मानपाडा, आनंद केमि., सागांव, नांदिवली पाडा, स्टार कॉलनी, गावदेवी, चाररस्ता, डोंबिवली रेल्वे स्टेशन पश्चिम.

## पनवेल - डोबिंवली - पनवेल

## वेळापत्रक

**पनवेलवरून** पहिली बस ८.३५, ९.२०, १०.०५, १०.५०, १२.१०, १२.५५, १३.४०, १४.२५, १६.३५, १७.२०, १८.०५ ,१८.५०, २०.१०, २०.५५, २१.४० शेवटची बस २२.२५

**डोंबिवलीवरून** सुटण्याच्या वेळा पहिली बस ७.००, ७.४५, ८.३०, ९.१५, १०.३५, ११.२०, १२.०५, १२.५०, १५.००, १५.४५, १६.३०, १७.१५, १८.३५, १९.२०, २०.०५ शेवटची बस २०.५०